MHAH230001472017

**विशेष दिवाणी दावा क्र. ८/२०१७ मधील नि.५३ वरील आदेश**
**(अमोल साबळे वि.सिंधुबाई बबन व इतर)**

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीचे वारसांनी अर्जात कथन केले आहे की, वादी दि. १४/०७/२०२४ रोजी रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे मयत झाले. तरी अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे कायदेशीर वारस दावा सरनाम्यात घेण्यात यावेत व तशी दुरुस्तीची करण्याची परवानगी मिळावी.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्ज मंजुर होण्यास हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, दाव्याचे कामकाज लांबवण्याच्या दृष्टीने उशिर केला आहे. तरी अर्ज रद्द करावा. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास २५००/– रुपये कॉस्ट करण्यात यावी.

४. अभिलेख पडताळला. वर्णनयादी निशाणी ५६ लगत असलेले मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी अमोल रंगनाथ साबळे हे दि. १४/०७/२०२४ रोजी पुणे येथे मयत झाले आहेत. प्रस्तुतचा दावा हा खरेदीखत रद्द करुन मिळण्याकरीता व निरंतर ताकीदीचे मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. सबब वादीचे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक आहे. तरी वादीचे प्रस्तावित वारस अभिलेखावर घेवुन त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज नि. ५३ मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत वादीचे प्रस्तावित वारस दाव्यात समाविष्ट करुन त्याबाबतची आवश्यक दुरुस्ती पुढील तारखेपर्यत मुळ दाव्यात करावी व तशी दुरुस्त प्रत दाखल करावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.01.20 13:30:08 +0530

श्रीगोंदा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

दिनांक २०/०१/२०२५. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.